महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२०२२/ 497 दिनांकः- 21 FEB 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.........

संदर्भः- या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/ विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/४४२ दि. १६/०२/२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडिबीटी पोर्टलवरील , तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या अंमलबजावणीकरिता मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. **१७/०२/२०२०** रोजी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकीच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

१) शैक्षणिक वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ करिता संस्थांनी , महाडिबीटी पोर्टलवरील आपणास दिलेल्या दोन्ही लॉगीन मध्ये II Installment साठी प्राप्त झालेली यादी चेक करावी. व जर सदर अर्ज लॉगीन मध्ये प्रलंबित असल्यास तात्काळ सदर विद्यार्थ्याचे हजेरी अहवाल ऑनलाईलरित्या नमुद करून दोन्ही लॉगीन मधून Send for Approval करिता पाठविण्यात यावे. जर विद्यार्थी II Installment करिता पात्र नसेल (विद्यार्थी हा Detain असेल ) **, तर Clerk Login मधून अशा विद्यार्थ्यांची हजेरी** 00 **(शून्य) नमुद करून II instalment मिळणा-या लाभाअंतर्गत करिता Reject करण्यात यावे. प्रलंबित ठेवू नये.**

२) तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता आपल्या लॉगीन मध्ये I Installment अंतर्गत त्रुटी अभावि प्रलंबित असलेले अर्ज प्रथम प्राधान्याने निकाली काढावेत. जर सदर अर्जातील त्रुटीची पुर्तता होत नसल्यास अर्ज आपल्या लॉगीन मधून थेट Reject करण्यात यावे.

३) तसेच **शैक्षणिक वर्ष २०२१-२२** करिता आपल्या लॉगीन ला शिष्यवृत्तीअंतर्गत प्राप्त् झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची , शासन निर्णयातील अटी व शर्तीनूसार काटेकोरपणे तपासणी करून शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्याचेच अर्ज Approval करिता पाठविण्यात यावे. (संबंधित शासन निर्णय महाडिबीटी पोर्टलवर उपलब्ध आहेत.) **अन्यथा विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आढळून आल्यास, सदर अर्ज या कार्यालयामार्फत थेट नामंजूर (Reject) करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्याची राहील.**

४) **तसेच "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" या योजनांतर्गत आपल्या लॉगीन ला प्राप्त् झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करतांना सदर विद्यार्थी हा खरोखर वसतिगृहात किंवा ठिकाणी राहत आहेत का याबाबतचे शहानिशा करण्याबाबतचे संस्थाचे प्राचार्यानी साक्षांकित केलेले हमीपत्र विद्यार्थ्यांच्या अर्जात अपलोड करावे . (हमीपत्र नमुना संलग्न)**

उपरोक्त सुचनेप्रमाणे संस्थास्तरावर कार्यवाही करण्यात यावी. तथापि आपण न केलेल्या कार्यवाही मुळे पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती पासून वंचित राहीले तर यांची सर्वस्वी जबाबादारी संस्था प्रमुखाची राहील, याची नोंद घ्यावी.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

जावक क्रमांक:-

**दिनांक:-**

## हमीपत्र

मी................................ ....प्रमाणित करतो /करते की, "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" या योजनांतर्गत अर्ज सादर केलेला विद्यार्थी ........................................ हा आमचे महाविद्यालय/तंत्रनिकेतनमधील शैक्षणिक वर्ष..................... मधील नियमित प्रवेशित विद्यार्थी आहे. सदर विद्यार्थी हा वसतिगृह / अन्य खाजगी ठिकाणी राहत असल्याबाबतची शहानिशा संस्थास्तरावरुन करण्यात आलेली आहे. तथापि शासन निर्णयातील अटी व शर्तीनूसार विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानूसार असून अर्ज मंजूर करण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे.

**प्राचार्याचे नाव :-**

**प्राचार्याची स्वाक्षरी:-**

**महाविद्यालयाचा शिक्का:-**